**2. सदनिकेची किंमत भरण्याचा कालावधी / टप्पे :-**

2.1. आपणास वाटप करण्यात येत असलेल्या सदनिकेची अंदाजित विक्री किंमत खालील टप्पे निहाय व विहित मुदतीमध्ये ऑनलाईन पध्दतीने अर्जदार पती/पत्नी यांचे बँक खात्यामधुन NEFT/RTGS/Net Banking/UPI/Debit Card/Credit Car इत्यादी द्वारे रक्कमेचा भरणा करावयाची आहे.

| टप्पा | भरावयाची रक्कम | मुदत |
|---|---|---|
| 1 | सदनिकेच्या एकूण किंमतीच्या 25 % रक्कम | तात्पुरते देकार पत्र लॉगिन मध्ये उपलब्ध करून दिलेल्याच्या दिनांकापासून 45 दिवसांच्या आत रक्कम भरावयाची आहे. |
| 2 | उर्वरित 75 % रक्कम | टप्पा 1 च्या मुदतीनंतर पुढील 60 दिवसांत |

टप्पा 1- प्रथम टप्प्यातील 25% रक्कम रु. 751000/- (अनामत रक्कम वजा करून येणारी रक्कम) भरणे बंधनकार आहे.भरणा करण्याचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर (तात्पुरत्या देकारपत्राच्या दिनांकापासून 45 दिवसांनं द.सा.द.शे. नियमाप्रमाणे व्याज (म्हाडाच्या प्रचलित धोरणानुसार) आकारणीच्या अधीन राहून 15 दिवसांची मुदत देण्यात येईल.या कालावधीतही (तात्पुरत्या देकारपत्राच्या दिनांकापासून 60 दिवसांत) प्रथम टप्प्यातील 25% रक्कम भरल्यास सदनिकेचे वितरण कोणतीही पुर्व सुचना न देता रद्द केले जाईल.

टप्पा 2- टप्पा 1 च्या मुदतीनंतर पुढील 60 दिवसांत सदनिकेची उर्वरित 75 टक्के रक्कम रु. 2283000/- भरणे बंधनका आहे. या कालावधीतही (75% रक्कमेकरीताचे 60 दिवस) अर्जदाराने 75% रक्कम भरणा न केल्यास, 105 दिवसांचा वि कालावधी संपुष्टात आल्यानंतर द.सा.द.शे. नियमाप्रमाणे व्याज (म्हाडाच्या प्रचलित धोरणानुसार) दराने व आकारणीच्या अधिन राहून अर्जदारास अधिकतम 90 दिवसांची मुदतवाढ देण्यात येईल.यानंतरही (तात्पुरत्या देकारपत्र दिनांकापासून 195 दिवसांत) सदनिकेची किंमत अदा करण्यात अर्जदाराने कसूर केल्यास किंबहुना न भरल्यास तात देकारपत्र तात्काळ रद्द करण्यात येईल.

2.2 अर्जदाराचे तात्पुरते देकारपत्र रद्द झाल्यानंतर अर्जदाराने भरणा केलेल्या रक्कमेतुन सदनिकेच्या किंमतीच्या एवढी रक्कम समपहरण (Forfeit) करुन उर्वरित रक्कम विना व्याज अर्जदाराच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात र तथापी, अर्जदाराला तात्पुरते देकार पत्र दिल्यानंतर सदनिकेच्या विक्री किंमतीपैकी निरंक रक्कमेचा भरणा के असल्यास व सदनिकेचे वितरण रद्द झाल्यास उपरोक्त समपहरण करावयाची रक्कम अनामत रक्कमेपेक्षा ज भरल्यास, अर्जदारास अनामत रक्कमेचा परतावा करण्यात येणार नाही.

2.3 ज्या अर्जदारांना सदनिकेची 100% रक्कम एकाच टप्प्यामध्ये (एक रक्कमी) भरावयाची आहे, असे अर्जद तात्पुरत्या देकारपत्राच्या दिनांकापासून 45 दिवसांच्या आत सदनिकेची 100% रक्कम भरणे आवश्यक आहे.

2.4 सदनिकेच्या विक्री किमंतीचा भरणा करण्यासाठी लाभार्थीला वित्तिय संस्थेकडून गृहकर्ज घ्यावयाचे असल्यास अर्जदारांनी वित्तिय संस्थेचे कर्ज पुर्व मान्यता पत्रासह (Pre-Sanction Letter) ना-हरकत दाखल्यासाठी अर्ज Online करावयाचा असून अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांना तात्काळ ना-हरकत दाखला मंडळाकडून देण्यात येईल तथापी, अर्जद सदनिकेच्या विक्री किमंतीच्या 25% रक्कम भरणे बंधनकारक असेल या पश्चातच वित्तीय संस्थेच्या नावे ना-ह प्रमाणपत्र देण्यात येईल.

2.5 अर्जदार किंवा त्याचे पती / पत्नीने एकापेक्षा जास्त विविध प्रवर्गात / विविध संकेतामध्ये अर्ज केल्यास व त्याचे प्रवर्गात / विविध संकेतांमध्ये एकापेक्षा जास्त अर्ज सोडती मध्ये यशस्वी ठरल्यास त्यांना दोघांना मिळून एकच स वितरीत करण्यात येईल व अशा परिस्थितीत ज्या दुसऱ्या प्रवर्गामध्ये / सकेतांकामध्ये त्यांनी अर्ज केलेला असेल तेथून माघार घ्यावी लागेल.अशा प्रकारे माघार घेतलेल्या सर्व अर्जासाठी त्यांनी भरलेली अनामत रक्कम विनाव्याज रु. इतकी रक्कम प्रशासकिय खर्च म्हणून वजावट करुन परतावा करण्यात येईल.

Signature Not Verified
Rajendra Gangadhar Gaikwad
Dy.CO (Marketing)/ME

2.6 सदनिकेची संपुर्ण रक्कम मंडळाच्या खात्यामध्ये जमा झाल्यानंतरच सदनिकेचा प्रत्यक्ष ताबा देण्यात येईल.

2.7 सदनिका वितरणाच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदाराने सादर केलेले कागदपत्र/पुरावे / दाखले मुळ प्रती पडताळणीसाठी मागणी केल्यास त्या आपणास उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. मुळ प्रती सादर करणे बंधनकारक असेल त्यामध्ये कसुर केल्यास अथवा सादर केलेली कागद पत्र / पुरावे / दाखले बनावट किंवा चुकीची माहीती दिली असल्याचे निदर्शनास आल्यास अशा अर्जदारावर कायदेशीर कार्यवाही करुन सदनिका ताब्यात घेण्यात येईल व भरणा केलेली विक्री किंमत संपूर्ण समपहरण/ Forfeit केली जाईल.

**3. सदनिकेच्या किंमती व्यतिरिक्त पुढील रक्कम अदा करावी लागेल.**

3.1 नियमानुसार सदर सदनिकेच्या किंमतीपोटी भराव्या लागणा-या रकमेवर महाराष्ट्र शासनाचे योग्य ते मुद्रांक शुल्क व नोंदणी फी संबंधीत खात्याकडे भरावी लागेल.

3.2 सदनिकेचे 12 महिन्याचे आगाऊ सेवाशुल्क एकत्रीतरित्या भरणे बंधनकारक राहिल यापश्चात सदनिकेचा प्रत्यक्ष ताबा देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

3.3 शासनाच्या धोरणानुसार / अधिसूचनेनुसार मंडळाने विक्रीकरीता काढलेल्या सदनिकेस विक्री किंमती व्यतिरिक्त वस्तु व सेवा कर (Goods & Service Tax) / देखभाल खर्च लागू झाल्यास सदर कर अर्जदारांना संबंधित कार्यालयाकडे भरणा करणे आवश्यक राहील.

3.4 सदनिकेसाठी दर्शविण्यात आलेली विक्री किंमत तात्पुरती/अंदाजित असून मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ आणि महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांना सदनिकेच्या विक्रीची किंमत व दर अंतिम करण्याचा वा त्यामध्ये वाढ करण्याचा अधिकार राहील. सदनिकेची विक्री किमंतीमध्ये वाढ झाल्यास वाढीव किमंत अर्जदारांना विना अट भरणे बंधनकारक असेल.

4. यशस्वी अर्जदार विवाहित असल्यास सदनिकेचे वितरणपत्र व ताबापत्र अर्जदार व त्याची पती/पत्नी या दोघांच्या नावे करण्याची कार्यवाही ही महाराष्ट्र शासन पत्र क्र. न्यायाप्र-2015/प्र.क्र.168/गृनिभू/ गृनिवि, दि.24/09/2015 अन्वये संयुक्त नावे वितरण व ताबा करण्यात येईल.

5. सदनिका वाटप झाल्यानंतर सदनिकाधारकांनी तीन महिन्याच्या आत सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करुन सहकारी संस्था अधिनियम 1960 अन्वये सहकारी गृहनिर्माण संस्थेची नोंदणी करावी लागेल. सदनिकेच्या पाणीपुरवठा, जलनिसारण, बाह्यविद्युत पुरवठा, इत्यादी सुविधांची देखभाल व दुरुस्तीही कामे सहकारी संस्थेकडे घ्यावी लागेल.महानगरपालिकेचे / नगरपालिकेचे सर्व प्रकारचे कर संबंधित गृहनिर्माण संस्थेने त्या त्या स्थानिक संस्थाकडे परस्पर भरावे लागतील. तसेच म्हाडा मिळकत व्यवस्थापन विनियम 1981 मधील विनियम 21 नुसार नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थेस इमारतीचे अभिहस्तांतरण करुन घेणे आवश्यक आहे.

6.सदनिकेचा ताब्यात घेतल्यानंतर सदनिकेच्या कसल्याही प्रकारची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी मंडळाची राहणार नाही.

7. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, विक्री, हस्तांतरण व सदनिकेची अदलाबदल) विनियम, 1981 भाग-3 विनियम - 19 अन्वये अर्जदाराने सोडतीसाठी अर्ज भरताना वारसाचे नाव नामनिर्देशित केले आहे. सदनिका वितरणापुर्वी दुर्देवाने अर्जदाराचा मृत्यू झाल्यास सदर सदनिकेचा ताबा देणेबाबत पुढील कार्यवाही नामनिर्देशित वारसाचे नावे करण्यात येईल.सोडतीपश्चात अथवा सदनिकेची रक्कम भरुन घेण्यासाठी देण्यात आलेल्या तात्पुरते देकारपत्रानंतर अर्जदाराचा मृत्यू झाल्यास त्यांचे नामनिर्देशित वारसदारास सदनिकेची रक्कम तात्पुरत्या देकार पत्रातील मुदतीनुसार अदा करणे आवश्यक राहील. सदनिकेची रक्कम विहीत मुदतीमध्ये प्राप्त न झाल्यास सदनिकेचे वितरण रद्द समजण्यात येईल व प्रतिक्षायादी वरील अर्जदाराला संधी देण्यात येईल. त्याच बरोबर अर्जदाराने वारसाचे नाव नामनिर्देशित न केल्यास आणि वितरणापुर्वी अर्जदाराचा मृत्यु झाल्यास प्रतिक्षायादी कार्यान्वित करण्यात येईल.

Signature Not Verified
Rajendra Gangadhar
Gaikwad
Dy.CO (Marketing)/MB